# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, रायगड

जा.क्र.कृसंके/ठेका / /२०२३ दिनांक –

## निविदा सुचना (Tender Notice)

भात पैदास विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, रायगड या संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत. इच्छुक ठेकेदारांनी **मा.सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, रायगड (भात पैदास विभाग)** यांचे नावे आपले दरपत्रक सिलबंद लखोटयातून **दिनांक २६.०९.२०२३** रोजी दुपारी **३.००** वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावे.

| अ. क्र | कामाची यादी | कालावधी | ठेक्याची रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १ | CRPHT या योजनेतील (OHYT-S), (Station Hybirid trial), (Multilocation Evalution Trial प्लॉट क्र. ४१,४३ प्रयोगाची कापणी करणे, | ०१.१०.२०२३ ते ३१.१०.२०२३ | |
| २ | प्लॉट क्र. ४१,४३ कवळया करणे, भारे बांधणे, वाहतुक करणे, | | |
| १ | CRPHT या योजनेतील (OHYT-S), (Station Hybirid trial), (Multilocation Evalution Trial प्लॉट क्र. ४१,४३ प्रयोगाची भाताच्या नंबरची झोडणी करणे, साफसफाई व वजणे घेणे. | ०१.११.२०२३ ते ३०.११.२०२३ | |
| २ | भात बियाण्यांची लोखंडी बीणामध्ये साठवणूक करणे | | |
| १ | संकरीत भाताच्या पेरणीसाठी गादीवाफे तयार करणे. | ०१.१२.२०२३ ते ३१.१२.२०२३ | |
| २ | संकरीत भाताच्या अ,ब आणि र वाणांची पेरणी करणे. | | |
| ३ | संकरीत भाताच्या रोपावाटीकेला पाणी देणे, खते देणे. | | |
| १ | संकरीत भाताच्या रोपवाटीकेतील गवताची बेनणी करणे. | ०१.०१.२०२४ ते ३१.०१.२०२४ | |
| २ | संकरीत भाताच्या रोपाची अ व ब वाणांची काढणी करणे | | |
| ३ | संकरीत भाताच्या रोपाची मांडणी करूण लावणी करणे. | | |
| १ | संकरीत भाताच्या रोपाची अ व र वाणांची काढणी करणे. | ०१.०२.२०२४ ते २८.०२.२०२४ | |
| २ | संकरीत भाताच्या रोपाची अ व र वाणांची मांडणी करणे. | | |
| ३ | संकरीत भाताच्या बिजोत्पादन प्लॉटला पाणी व्यवस्थापण करणे. | | |
| १ | संकरीत भाताच्या बिजोत्पादन प्लॉटला खते देणे. | ०१.०३.२०२४ ते ३१.०३.२०२४ | |
| २ | संकरीत भाताच्या बिजोत्पादन प्लॉटमधील भाताची बेनणी करणे | | |
| ३ | प्रक्षेत्रावरील रस्त्याच्या व बांधावरील गवतावर तननाशकाची फवारणी करणे. | | |

कामासंबंधीच्या अटी व शर्ती सोबत देण्यात आलेल्या आहेत.

जा.क्र.कृसंके/कंत्राटी कामे/ 1793 / 662 /२०२३
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि. रायगड.
पिन कोड – ४१० २०१
दिनांक – 11 SEP 2023

**सहयोगी संशोधन संचालक,**
प्रादेशिक कृषि संशोधन
कर्जत जि. रायगड.

H:\RESHMA D\Paradhi sir\Labour file\Oct to March 2023-24 labour file\(Shubhangi Thakare) CRPHT file.docx

प्रत — प्रसिध्दीसाठी रवाना —

१. कार्यालय नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत (रायगड).

२. मा. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी.

३. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.

४. मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहिती... योग्य त्या प्रसिध्दीसाठी.

५. विद्यापिठ वेबसाईट. www.dbskkv.org

# संमती पत्रक

मी खाली सही करणार श्री/श्रीमती. ..........................................................................................

रा.........................................लिहून देतो/देते की प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, ता. कर्जत, जि.रायगड या प्रक्षेत्रावर दरपत्रकात नमूद केलेली कामे करण्यास मी तयार असून या बाबतच्या खालील अटी आणि शर्ती मला मान्य आहेत.

१. प्रक्षेत्रावरील कामे संबंधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅंक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबंधीत कामगारांच्या बॅंक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहित कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१(ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

१३. कामाची वेळ सकाळी ८.०० ते १२.३० आणि दुपारी २.०० ते ५.३० अशी राहील.

१४. ज्या दिवशी ठेकेदार गैरहजर राहणार त्यावेळी पुर्व सूचना देणे बंधनकारक राहील.

१५. प्रक्षेत्रावरील कामे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सुचनेनुसार करावयाची आहेत.

१६. कामाची गरज संपल्यावर कोणत्याही प्रकारची लेखी पूर्वसूचना न देता ठेका पध्दत रद्द केली जाईल.

१७. प्रक्षेत्रावर काम करत असताना कोणत्याही कारणाने व कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास सदरील अपघातास हे केंद्र जबाबदार राहणार नाही.

वरील अ. क्र. १ ते १७ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर करारनामा मी स्वखुशीने व कोणतेही दडपण न घेता लिहून देत आहे.

दि.

ठिकाण: सही, नांव व पत्ता

जा.क्र. प्राकृसंकें/ भापैवि / ~~862~~ 1793/२०२३
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड
दिनांक : 11 SEP 2023

प्रति,

**मा. विस्तार शिक्षण संचालक,**
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.

**विषय : विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीरातीस/दरपत्रक प्रसिध्दी देणेबाबत.....**

महोदय ,

सोबत जोडलेल्या दरपत्रकास/जाहीरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी मिळणेकरीता सविनय सादर.

धन्यवाद.

सोबत: वरीलप्रमाणे

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड.

H:\RESHMA D\Paradhi sir\Labour file\Oct to March 2023-24 labour file\(Samir More)CRPHT file.docx